## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. १९ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रासायनिक तंत्रज्ञान संस्थेतील बी.टेक. केमिकल इंजिनिअरिंगची विद्यार्थिनी तमन्ना चतुर्वेदी हिने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या नागोठणे मॅन्युफॅक्चरिंग डिव्हिजनमध्ये दोन महिन्यांची इंटर्नशिप यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर कंपनीने तिला ग्रॅज्युएट इंजिनिअर ट्रेनी पदासाठी वार्षिक ७.५ लाख रुपये वेतन पॅकेजची प्री-प्लेसमेंट ऑफर दिली आहे.

तमन्ना हिने १५ जून ते ७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत कंपनीच्या मॅन्युफॅक्चरिंग डिव्हिजनमधील सीटीएस विभागात इंटर्नशिप केली. या काळात तिने 'क्रॅकर प्लांटमधील विविध युटिलिटीजच्या वापराचे अनुकूलन करण्याच्या संधी ओळखण्यासाठी एक्सेल मॉडेल विकसित करणे' या महत्त्वपूर्ण प्रकल्पावर काम केले.

विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व प्लेसमेंट कक्षामार्फत विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख प्रशिक्षण, इंटर्नशिप आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानासोबतच औद्योगिक क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव मिळावा आणि नामांकित कंपन्यांमध्ये करिअर घडविण्याची संधी मिळावी, हा या उपक्रमांचा उद्देश आहे.

तमन्ना चतुर्वेदी हिच्या या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, केंद्रीय प्रशिक्षण व प्लेसमेंट कक्षाचे समन्वयक प्रा. उज्वल पाटील तसेच विद्यापीठ रासायनिक तंत्रज्ञान संस्थेचे प्रा. ए. के. गोस्वामी आणि प्रा. राजकुमार सिरसाम यांनी तिचे अभिनंदन केले असून, पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

दरम्यान, यापूर्वी विद्यापीठातून २०२६ मध्ये उत्तीर्ण झालेल्या मनीष माळी आणि लक्ष्मी कोहाड यांनाही रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडकडून अशाच प्रकारच्या प्री-प्लेसमेंट ऑफर मिळाल्या होत्या. त्यामुळे विद्यापीठातील विद्यार्थ्यांना नामांकित औद्योगिक कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी मिळत असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

**बातमी क्र. २**

जळगाव, दि. १९ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'साहित्य सृजन' भित्तिपत्रिकेचे विमोचन करण्यात आले.

यावेळी राज्य मराठी विकास संस्था संचालक डॉ. शामकांत देवरे, मंत्री उदय सामंत यांचे विशेष कार्य अधिकारी राजेश सोळंके, सुनील पाटील व वासंती काळे उपस्थित होते.

डॉ. शामकांत देवरे यांनी अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी अस्मिता जागृत करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याचे सांगितले. तसेच अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात ९९ साहित्य संमेलने आयोजित केली जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा. म. सू. पगारे होते. यावेळी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. खेमराज पाटील यांनी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

..........................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १९ ऑक्टोबर, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी करीता**